दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ५८ गुरुवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue-58 Thursday, Dt. 05 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

बीड जिल्ह्यात वाघाची डरकाळी!



बीड प्रतिनिधी

यवतमाळच्या टिपेश्वर अभयारण्यातून तब्बल सहा जिल्ह्यांचा मोठा प्रवास करत बीड जिल्ह्यात दाखल झालेला पट्टेदार वाघ आता नायगाव मयूर अभयारण्यात पोहोचला आहे. चार दिवसांपूर्वी सायंकाळी सहाच्या सुमारास एका पाणवठ्यावर पाणी पिताना हा वाघ वनविभागाच्या ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे.

२०२२ मध्ये टिपेश्वरमधील 'टी-२२' वाघिणीच्या पोटी जन्मलेल्या या वाघाने अन्नाच्या आणि स्वतःच्या हक्काच्या जंगलाच्या शोधात नांदेड, लातूर, सोलापूर, धाराशिव, अहिल्यानगर मार्गे बीड गाठले आहे. यापूर्वी २० ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी तालुक्यात दिसल्यानंतर तो गायब झाला होता. पुढे १७ ऑक्टोबरला पाटोदा तालुक्यातील सगळेवाडी आणि जरेवाडी परिसरात त्याने दोन शिकारी केल्याचे समोर आले होते.

वाघाच्या सुरक्षिततेसाठी आणि त्याच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी पाटोदा वनपरिक्षेत्रात तब्बल २० ट्रॅप कॅमेरे आणि ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. वनविभागाचे विशेष पथक तैनात करण्यात आले असून दररोज पेट्रोलिंग सुरू असल्याची माहिती पाटोदा वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल घोडके यांनी दिली आहे.

बीड नगरपरिषदेत लोकशाहीचा गळा घोटल्याचा भाजपाचा आरोप!

चर्चा नाही, मतदान नाही तरीही १८ विषयांचे ठराव मंजूर ? भाजप-राष्ट्रवादी आक्रमक, सभा रद्द करण्याची मागणी

अन्यथा थेट न्यायालयात जाणार, विरोधकांचा इशारा

३ नोव्हेंबर रोजी झालेली सर्वसाधारण सभा आणि त्यात मंजूर दाखवलेले सर्व ठराव तातडीने रद्द करावेत, अशी मागणी दोन्ही पक्षांच्या गटनेत्यांनी केली आहे. नवीन सभा होईपर्यंत या ठरावांची अंमलबजावणी, निविदा प्रक्रिया, वर्क ऑर्डर आणि देयकांचे वितरण स्थगित ठेवावे. तसेच सभेच्या प्रोसिडिंगमध्ये हे ठराव संमत झाल्याची नोंद करू नये, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सभेचे व्हिडिओ चित्रीकरण सुरक्षित जतन करून सर्व सदस्यांना रीतसर नोटीस देत चर्चेसह नव्याने सभा आयोजित करावी, तसेच सभागृहात गैरवर्तन आणि अपशब्द वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी आहे. प्रशासनाने योग्य पावले न उचलल्यास विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग आणि उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशारा देण्यात आला आहे.

बीड प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत प्रचंड गोंधळ सुरू असताना कोणतीही चर्चा अथवा मतदान न घेता घाईगडबडीत १८ विषयांचे ठराव मंजूर केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या कथित बेकायदेशीर प्रक्रियेविरोधात भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, ३ नोव्हेंबर रोजी झालेली सर्वसाधारण सभा आणि त्यातील सर्व ठराव तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात भाजप



गटनेत्या डॉ. सारिकाताई योगेश क्षीरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते खुर्शीद आलम यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आणि नगराध्यक्षांना स्वतंत्र लेखी निवेदने दिली आहेत.

लोकनेते खा. गोपीनाथ मुंडे सभागृहात मंगळवारी आयोजित सर्वसाधारण सभेच्या कार्यपत्रिकेवर १८ विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आले होते. मात्र, सभेदरम्यान नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी भाजप गटनेत्यांविषयी अपशब्द वापरल्याने सभागृहात मोठा गदारोळ निर्माण झाला. अशा परिस्थितीत सभाध्यक्षांनी सभा तहकूब करणे आवश्यक असताना तसे न करता सभागृहाचे लक्ष विचलित असतानाच उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी केवळ विषय वाचून दाखवत ठराव परस्पर संमत झाल्याचे घोषित केले, असा गंभीर आरोप डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी निवेदनातून केला आहे.

सभेत कोणत्याही विषयावर चर्चा झाली नाही,सूचक-अनुमोदकांची नोंदणी झाली नाही किंवा मतदानही घेण्यात आले नाही. असे असताना ठराव मंजूर झाल्याचे घोषित करणे म्हणजे लोकशाही प्रक्रिया

निष्क्रियता आणि भ्रष्टाचारावरून लक्ष हटवण्यासाठी वैयक्तिक टीकाटिप्पणी.?

शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यात सत्ताधाऱ्यांना पूर्णपणे अपयश आले असून, स्वतःची निष्क्रियता आणि भ्रष्टाचारावरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठीच महिला गटनेत्यावर सभागृहात जाणीवपूर्वक वैयक्तिक टीकाटिप्पणी करण्यात आली, असा घणाघाती आरोप भाजप नगरसेवकांनी केला आहे. लोकशाहीच्या मंदिरात सभागृहाची प्रतिष्ठा आणि महिला लोकप्रतिनिधीचा सन्मान राखला जाणे अपेक्षित असताना अपशब्दांचा वापर होणे ही गंभीर बाब असल्याचे सांगत संबंधित नगरसेवकावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बीडच्या नगर पालिका कारभारात नेमके काय सुरू आहे ? सभागृहात चर्चा आणि मतदाना शिवाय ठराव मंजूर होऊ शकतात का ? विरोधकांच्या आरोपांवर प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

आणि कायदेशीर नियमांचे उल्लंघन असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. एकीकडे बीड शहर पाणीटंचाईसह विविध मूलभूत नागरी समस्यांनी त्रस्त असताना नागरिकांना दिलासा देणारे निर्णय घेण्याऐवजी भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणारे निर्णय रेटले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विशेषतः कार्यपत्रिकेवरील विषय क्रमांक १० मधील 'सोलर हायमास्ट' कामातील कथित अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय तत्काळ रोखण्याची मागणी करण्यात आली आहे.

सरपंच जयश्री वरेकर यांना दिलासा, अपात्रतेची तक्रार विभागीय आयुक्तांकडून फेटाळली

शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का देण्याचा प्रयत्न करणारा पडद्यामागील 'सुपारीबहाद्दर' कोण?



बीड प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या पत्नी तथा कुटेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री गणेश वरेकर यांना विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांच्या विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (१) अन्वये दाखल करण्यात आलेली अपात्रतेची तक्रार विभागीय आयुक्तांनी फेटाळून लावल्याने त्यांचे सरपंचपद कायम राहिले आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, या तक्रारीमागील राजकीय हेतूंबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

कुटेवाडी (ता. जि. बीड) येथील सरपंच जयश्री वरेकर यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर रस्त्यांची कामे नियोजित ठिकाणी न करता अन्यत्र केल्याचा तसेच कामांमध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप गावातील रहिवासी तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे यांनी केला होता. यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून सरपंचांना अपात्र ठरविण्याची मागणी केली होती.

तक्रारीनंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करून प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला. विभागीय आयुक्तांसमोर झालेल्या सुनावणीत सरपंच जयश्री वरेकर यांच्या वतीने अँड. श्रीकांत जी. कवडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. संबंधित कामांच्या ठिकाणांमध्ये ग्रामस्थांच्या सूचनेनुसार आणि ग्रामसभेच्या निर्णयानुसार बदल करण्यात आल्याचे तसेच भ्रष्टाचार अथवा आर्थिक अनियमिततेचे आरोप सिद्ध होत नसल्याचे त्यांनी मांडले. दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि कायदेशीर बाबी विचारात घेऊन विभागीय आयुक्तांनी अपात्रतेची तक्रार फेटाळली.

'सुपारीबहाद्दर' पडद्यामागे कोण ? राजकीय कटकारस्थानाच्या आरोपाने चर्चेला नवे वळण.!

या संपूर्ण प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे या तक्रारीमागे खरोखरच राजकीय सूडबुद्धी होती का ? शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांचे राजकीय वर्चस्व कमी करणे, त्यांची प्रतिमा मलिन करणे आणि राजकीय बदनामी घडवून आणणे, या हेतूनेच नंदकुमार कुटे यांच्यामार्फत ही तक्रार करण्यात आल्याचा आरोप आता वरेकर समर्थकांकडून केला जात आहे. त्यांच्या मते, हा संपूर्ण प्रकार राजकीय कटकारस्थानाचा भाग होता.

मात्र, या आरोपांमुळे आता एक वेगळाच प्रश्न उपस्थित झाला आहे. जर ही तक्रार राजकीय हेतूनेच करण्यात आली होती, तर तक्रारदार नंदकुमार कुटे यांच्या पाठीशी नेमके कोण होते ? पडद्यामागून राजकीय सूत्रे हलविणारे ते 'सुपारीबहाद्दर' कोण ? कोणाच्या सांगण्यावरून हा संपूर्ण डाव रचण्यात आला होता ? या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नाहीत.

आता विभागीय आयुक्तांनी तक्रार फेटाळल्यानंतर या आरोपांना राजकीय चर्चेत अधिक धार आली आहे. नंदकुमार कुटे हे पडद्यामागील कथित सूत्रधारांची नावे आणि चेहरे उघड करणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

एकीकडे सरपंच जयश्री वरेकर यांचे पद कायम राहिले, तर दुसरीकडे या तक्रारीमागील कथित राजकीय सूत्रधार कोण, हा प्रश्न अनुत्तरित आहे. त्यामुळे कुटेवाडीच्या सरपंचपदाच्या वादापेक्षा आता पडद्यामागील राजकीय खेळाडूंची चर्चा अधिक रंगू लागली आहे.!

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ गुणवत्तापूर्ण सेवा देणे हे प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे कर्तव्य- डॉ. किरण जाधव



छत्रपती संभाजीनगर(जिमाका): महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा सामान्य माणसाला कायद्याने दिलेला अधिकार आहे. त्याचे संरक्षण करुन वेळेत व गुणवत्तापूर्ण सेवा देणे, हे प्रशासनात कार्यरत प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. त्यास प्राधान्य देऊन आपले कर्तव्य बजावावे, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाचे छत्रपती संभाजी नगर विभागाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, उपवनसंरक्षक सुरेखा माने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. माहिती तंत्रज्ञान कक्षाचे प्रकल्प संचालक शरद दिवेकर यांनी सादरीकरण केले.

डॉ.जाधव यांनी जिल्हा प्रशासनातील प्रत्येक विभागाचा तालुकानिहाय आढावा घेतला. प्राप्त अर्ज व प्रलंबित अर्ज तसेच देण्यात आलेल्या सेवांची माहिती त्यांनी दिली. ऑनलाईन पोर्टलवर भरण्यात यावयाच्या माहितीबाबत येणाऱ्या तांत्रिक अडचणींवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच अपिलात गेलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. सेवा संकल्प अभियानात देण्यात आलेल्या सेवांचाही आढावा घेण्यात आला.

डॉ. जाधव म्हणाले की, सेवा मिळविण्यासाठी आलेल्या नागरिकांना सेवा तात्काळ व गुणवत्तापूर्ण देण्यात यावी. अपिलात गेलेल्या प्रकरणांसंदर्भात अपिलकर्त्यांचे समुपदेशन करण्यात यावे. प्रशासनाने आपल्या प्रतिसादात आणि सेवांमध्ये अधिकाधिक लोकाभिमुखता आणावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी गौडा यांनी प्रलंबित अर्जांची माहिती घेऊन त्याचे तात्काळ निराकरण करावे. प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी प्रयत्न करावे, असे निर्देश दिले.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
गुरुवार दि. ०५ नोव्हेंबर २०२६
Thurssday, Dt. 05 November 2026
पान -२
PAGE - 2

विद्यार्थ्यांच्या मेहनतीला मिळाला सन्मान, पशुवैद्यकीय सेवेच्या बळकटीकरणाकडे शासनाचे संवेदनशील पाऊल..!

समर्थ राजयोग । अग्रलेख

शिक्षण घेणे, ज्ञान मिळवणे आणि त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष समाजासाठी उपयोग करणे, हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असतो. मात्र, व्यावसायिक शिक्षणाच्या अंतिम वर्षात प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांना केवळ अनुभवाचीच नव्हे, तर आर्थिक आधाराचीही गरज असते. विशेषतः पशुवैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये वर्षभर सेवा देताना अनेक आर्थिक आणि व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप निर्वाह भत्त्यात अकरा हजारांवरून अठरा हजार रुपये प्रतिमहिना वाढ करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आणि संवेदनशील आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना भारतीय पशुचिकित्सा परिषदेच्या निर्देशानुसार एक वर्षाची आंतर्वासिता पूर्ण करणे अनिवार्य आहे. या काळात विद्यार्थी ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये प्रत्यक्ष काम करतात. पशुधनाच्या आजारांवर उपचार, लसीकरण, पशुपालकांना मार्गदर्शन आणि पशुसंवर्धनाच्या विविध जबाबदाऱ्यांमध्ये ते सहभागी होतात. मात्र, या सेवेसाठी मिळणारा अकरा हजार रुपयांचा भत्ता आजच्या महागाईच्या काळात निवास, भोजन आणि प्रवासाचा खर्च भागवण्यासाठी अपुरा ठरत होता. त्यामुळे सात हजार रुपयांची वाढ करून अठरा हजार रुपये प्रतिमहा भत्ता देण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मोठा दिलासा देणारा आहे.

विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणजे उद्याच्या पशुवैद्यकीय व्यवस्थेतील गुंतवणूक.!

पशुवैद्यकीय विद्यार्थी हे केवळ पदवी मिळवण्यासाठी प्रशिक्षण घेणारे युवक नाहीत, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असलेल्या पशुधनाच्या आरोग्याची जबाबदारी भविष्यात सांभाळणारे तज्ज्ञ आहेत. शेतकऱ्यांसाठी गाय, म्हैस, शेळी, मेंढी आणि इतर पशुधन हे उत्पन्नाचे साधन असते. एखादा जनावर आजारी पडला, तर त्या पशुपालकाच्या संपूर्ण आर्थिक गणितावर परिणाम होतो. अशा वेळी वेळेवर आणि दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणे अत्यंत आवश्यक असते.

ग्रामीण भागात अनेकदा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता, दवाखान्यांमधील अपुरी मनुष्यबळ व्यवस्था आणि दुर्गम भागातील सेवांची मर्यादित उपलब्धता अशा समस्या जाणवतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देतानाच त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. शासनाचा वाढीव भत्त्याचा निर्णय या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

या निर्णयानुसार दरमहा अठरा हजार रुपयांच्या भत्त्यापैकी पंधरा हजार रुपये राज्य शासनाकडून, तर उर्वरित तीन हजार रुपये भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि विद्यापीठाच्या निधीतून दिले जाणार आहेत. परिषदेकडून सहा महिन्यांसाठीच निधी उपलब्ध होत असल्याने उर्वरित सहा महिन्यांचा खर्च विद्यापीठाच्या स्वनिधीतून करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

पशुधन वाचले तर शेतकऱ्याचे अर्थचक्र टिकेल.!

आज शेतीसमोर अनेक संकटे उभी आहेत. निसर्गाची अनिश्चितता, पावसाचे असमतोल प्रमाण, चारा आणि पाण्याची टंचाई, वाढता उत्पादन खर्च या समस्यांमध्ये पशुपालन हा ग्रामीण कुटुंबांसाठी आर्थिक आधार ठरतो. त्यामुळे पशुधनाचे आरोग्य जपणे ही केवळ पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संरक्षणाची गरज आहे.

पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात काम करताना योग्य सुविधा, आवश्यक औषधे, आधुनिक उपकरणे आणि अनुभवी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळाले, तर त्यांच्या प्रशिक्षणाचा दर्जा निश्चितच उंचावेल. केवळ भत्ता वाढवून शासनाची जबाबदारी संपत नाही. या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रात काम करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

निर्णयाचे स्वागत, आता अंमलबजावणीही प्रभावी व्हावी.!

शासनाने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद असला, तरी त्याचा लाभ विद्यार्थ्यांना वेळेत आणि नियमितपणे मिळणे गरजेचे आहे. वाढीव भत्त्याचे वितरण रखडू नये, ग्रामीण भागात प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आंतर्वासिता पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा पशुवैद्यकीय आरोग्य व्यवस्थेला प्रत्यक्ष फायदा व्हावा, यासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

शेवटी, पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यातील सात हजार रुपयांची वाढ ही आकड्यांची केवळ वाढ नाही; ती त्यांच्या श्रमांची, जबाबदारीची आणि भविष्यातील योगदानाची घेतलेली दखल आहे. विद्यार्थ्यांच्या हाताला आर्थिक बळ मिळाले, तर त्यांच्या सेवेला अधिक आत्मविश्वास मिळेल. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण पशुपालकांना होईल आणि पशुधनाच्या आरोग्याला नवी दिशा मिळेल.कारण पशुधनाचे आरोग्य सुरक्षित असेल, तर पशुपालकाचे कुटुंब सुरक्षित राहील. पशुपालक सक्षम असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल.!

विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करणारा शासनाचा हा निर्णय निश्चितच अभिनंदनीय आहे. आता या निर्णयाचे रूपांतर सक्षम पशुवैद्यकीय सेवा आणि समृद्ध ग्रामीण महाराष्ट्रात होणे, हीच अपेक्षा..!

शिक्षण महर्षी शामराव गदळे व बाळू ताई गदळे यांना अभिवादन करण्यासाठी दहिफळ वड येथे उसाळला जनसागर

बीड प्रतिनिधीः केज तालुक्यातील दहिफळ वड येथे एक नोव्हेंबरला शामराव गदळे गुरुजी बाळू ताई गदळे यांचे पुण्यस्मरण आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ह भ प समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे किर्तन ठेवले होते.

शिक्षण महर्षी शामराव गदळे व त्यांच्या पत्नी बाळू ताई गदळे यांनी केलेले सामाजिक व शैक्षणिक काम याची माहिती इंदुरीकर महाराजांना असल्यामुळे त्यांनी पुण्यस्मरणा निमित्त आयोजित कार्यक्रमास दुसऱ्यांदा आपली तारीख दिली.

यावेळी बोलत असताना महाराज म्हणाले की, या व्यसनाधीन, माणुसकी हरवलेल्या, नैतिकता संपलेल्या व स्वार्थी समाजाला फक्त संत, ग्रंथ व भगवंत तारू शकतात. त्यांना सन्मार्गाला लावू शकतात. यावेळी महाराजांनी निरनिराळे उदाहरण दाखले देऊन कीर्तनात रस निर्माण केला. लोकांना दोन तास मंत्रमुग्ध करून सोडले. कीर्तनाचा समारोप करीत असताना महाराजांनी शामराव गुरुजी शिक्षण महर्षी का झाले ? त्यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये कसे काम केले ? तो काळ आणि आजचा बदलता काळ



याचेही सविस्तर असे विवेचन केले.

याप्रसंगी कार्यक्रमास ह भ प रतन महाराज, ह भ प व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गीते, ह भ प हरिदास महाराज जोगदंड, ह भ प तुकाराम महाराज आंधळे. तसेच राजकीय क्षेत्रातील सर्वश्री नंदकिशोरजी मुंदडा नगराध्यक्ष अंबाजोगाई, रमेशराव आडसकर, संतोष हंगे जिल्हा परिषद सदस्य बीड, विजयकांत मुंडे जि प सदस्य, डॉक्टर वासुदेव नेहरकर, रमाकांत मुंडे, संजय गंभीरे, सुरज पटाईत, भागवत चौरे, डॉक्टर बाबासाहेब कराड, संपत कराड, डॉक्टर बारकू मॅडम, डॉक्टर घुमरे मॅडम सह गावातील, परिसरातील, विडा जि प सर्कल, नांदूर जि प सर्कल आणि पाली सर्कल येथील सर्व क्षेत्रातील गुरुजी, ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर, ह भ प माऊली महाराज, ह भ प केशव महाराज घुले शास्त्री, ह भ प केशव महाराज मंडळी अफाट संख्येने उपस्थित होती. आलेल्या मंडळीचा सन्मान करण्याचे काम सखाहरी गदळे, डॉक्टर शशिकांत दहिफळकर, इंजिनीयर शरद गदळे, डॉक्टर शालिनीताई कराड, श्री राहुल गदळे, सरपंच अनिता गदळे, प्राचार्या जयश्री गदळे, श्री जयदत्त दहिफळकर व भाग्यश्री दहिफळकर यांनी केला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दहिफळ, काळेगाव, पिंपळगाव व बनकराजा येथील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. अशी माहिती प्रसार माध्यमांना मा सरपंच तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीत एकनाथ शिंदे यांनी ऊसतोड कामगारांची दिवाळी गोड केली - मनोज शिंदे

केज/प्रतिनिधी

राज्यातील कष्टकरी, शेतकरी आणि सर्व सामान्यांच्या सुख- दुःखात सहभागी होण्याची भूमिका शिवसेनेने नेहमीच जपली आहे. ऊसतोड कामगारांचे योगदान मोठे असून त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्या कुटुंबांच्या आनंदात सहभागी होणे ही आपली जबाबदारी आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कायम कष्टकरी आणि गरजू घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन प्रत्येक ऊसतोड कामगाराची दिवाळी गोड करणार असे प्रतिपादन शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांनी केले.तर ऊसतोड कामगारांच्या हितासाठी शिवसेना कटिबद्ध असून प्रत्येक ऊसतोड कामगारांच्या घरात शिधा पोहोच करणार असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केले.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने शिवसेनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना दिवाळी निमित्त शिधा वाटपाचा कार्यक्रम मंगळवार दि. ३ नोव्हेंबर रोजी केज तालुक्यातील गंगा माऊली शुगर येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते जवळपास १२०० ऊस तोड कामगारांना शिधा (किराणा सामना) वाटप करण्यात आले. शिवसेना बीड जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमाला शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिकांची उपस्थिती होती.

यावेळी मनोज शिंदे म्हणाले की, जिल्ह्यातील हजारो कुटुंबे दरवर्षी ऊसतोडीसाठी आपल्या गावापासून दूर जातात.कुटुंबा पासून दूर राहून ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता हे कामगार रात्रंदिवस कष्ट करतात. त्यांच्या घामातून साखर उद्योगाला चालना मिळते. मात्र या कामगारांच्या कुटुंबांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कष्टकरी बांधवांच्या आयुष्यात सणासुदीच्या काळात आनंदाचे काही क्षण निर्माण व्हावेत हीच या शिधा वाटपामागची या भावनेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भावना आहे असे शिंदे म्हणाले.



यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की,बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांचे राज्याच्याअर्थव्यवस्थेत मोठे योगदान आहे. मात्र दिवाळी सारख्या सणाच्या काळातही अनेक कामगार आपल्या कुटुंबापासून दूर राहून काम करत असतात. अशा कामगारांना दिवाळी तील आनंदाचा वाटा उचलता यावा या उद्देशाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने शिधा वाटपाचा उपक्रम घेण्यात आला. शिवसेना ही नेहमीच कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी संघटना राहिली आहे. यापुढेही ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांसाठी शिवसेना ताकदीने त्यांच्या पाठीशी उभी राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमासाठी यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये परमेश्वर कराड, चंद्रकांत नवले, हनुमंत काका मोरे व्हाईस चेअरमन गंगा माऊली शुगर, विजयप्रकाश ठोंबरे, योगेश नवले, सुरवसे साहेब, पृथ्वीराज पाटील, केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे शिवसेना, अविनाश आदनाक,दत्तकुमार काकडे, राजाभाऊ लोमटे,अर्जुन वाघमारे, सय्यद माजेद, अड. दिनकर सपाटे,प्रकाश गुंड, आदित्य रांजणकर, महेंद्र चाटे, पृथ्वीराज इंगळे, सय्यद पाशा, विश्वासराव जाधव, दादासाहेब पटाईत, शिवाजी गायकवाड, प्रकाश रोमन, रामहरी कोल्हे, हनुमंत हावळे, महादेव चाटे, दशरथ चाटे, शिवशंकर पाटील, नाईकनवरे, अमर माने, हरिभाऊ चाटे, रवी मुडेगावकर, सुनिता जाधव,आम्रपालीताई गजेशीव,बालासाहेब पवार, अंगद वाघमारे, सतीश पटाईत, मनोज गोंड, प्रथमेश खोमणे, देविकांत सोनवणे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी शिवसैनिक व मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगार हजर होते.

दुष्काळग्रस्त माळेवाडी येथे ५०० शेतकरी कुटुंबांची दिवाळी मनसेने केली गोड!

नवी मुंबई मनसेच्या वतीने महाराष्ट्र धर्माचा शिधा वाटप; गजानन काळे यांची माळेवाडी येथे प्रत्यक्ष भेट



केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या माळेवाडी गावातील ५००शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्यासाठी नवीमुंबई महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र धर्माचा शिधा वाटप करण्यात आले.

नवी मुंबई मनसे च्या पदाधिकाऱ्यांनी माळेवाडी येथे प्रत्यक्ष भेट देत शेतकरी कुटुंबांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या उपक्रमामुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या सणा निमित्त आनंद फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दुष्काळ, पाणीटंचाई आणि आर्थिक संकटामुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसमोर सण- उत्सव साजरे करण्याचे ही आव्हान उभे राहते. अशा परिस्थितीत केवळ मदतीचा हात न देता शेतकरीबांधवांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याच्या भावनेतून नवी मुंबई मनसेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ५०० शेतकरी कुटुंबांना दिवाळीनिमित्त शिधा वाटप करून सामाजिक एकतेचा आणि महाराष्ट्र धर्माचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला नवी मुंबई शहराध्यक्ष तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते गजानन काळे, बीड जिल्हाध्यक्ष सुमंत धस, केज तालुकाध्यक्ष अतुल आप्पा कुलकर्णी, शेतकरी सेना केज तालुकाध्यक्ष महादेव घुले, चित्रपट सेना राज्य उपाध्यक्ष श्रीकांत माने, नवी मुंबई मनसे युनियन अध्यक्ष आप्पासाहेब कोठुळे, विभागाध्यक्ष अक्षय भोसले, योगेश शेटे, शाखाध्यक्ष योगेश शिंदे, गणेश पाटील, रोजगार स्वयंरोजगारचे शहर संघटक सनप्रीत तुरमेकर, विद्यार्थी-सेनेचे प्रद्युमन हेगडे, मयंक घोरपडे, रोहन वेंगुर्लेकर आणि अनिकेत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी माळेवाडी गावचे मनसे शाखाध्यक्ष गोविंद हाके,सरपंच सुदाम दादा हाके, गोपाळ हाके, अशोक शिंदे, रामेश्वर हाके, पांडुरंग हाके, श्रीकांत वाघमोडे यांच्यासह गावातील नागरिक, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅपिडो बाईक टॅक्सी सेवेसाठीचे ॲप वापरणे टाळावे बीडमधील नागरिकांना विपुल पिंगळे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात रॅपिडो कंपनीच्या बाईक टॅक्सी सेवेसंदर्भात सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी बीड शहरातील नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. नागरिकांनी रॅपिडो कंपनीचे बाईक टॅक्सी ॲप वापरणे टाळावे, तसेच कोणत्याही दुचाकी वाहनमालकांनी आपली वाहने रॅपिडो ॲपवर नोंदणीकृत () करू नयेत, असे त्यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रॅपिडो बाईक टॅक्सी सेवेसंदर्भात नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. सध्या बीड शहरात रॅपिडोच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या दुचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या कारवाईमध्ये संबंधित दुचाकी वाहनमालकांना आर्थिक दंडाला सामोरे जावे लागत असून, नियमानुसार गुन्हे दाखल होण्याचीही शक्यता आहे.विशेष म्हणजे, रॅपिडो कंपनीच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या वाहनमालकांवर कारवाई होत असताना कंपनीला थेट दंडाचा फटका बसत नाही. मात्र, प्रत्यक्ष कारवाईचा आर्थिक आणि कायदेशीर परिणाम दुचाकी मालकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ काही उत्पन्नाच्या अपेक्षेने वाहनमालकांनी स्वतःला कायदेशीर अडचणीत आणू नये, असे पिंगळे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, रॅपिडो कंपनीचे ॲप बंद करण्यासाठी बीड आरटीओ कार्यालयाकडून आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे नागरिकांनी आणि दुचाकी वाहनमालकांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन विपुल पिंगळे यांनी केले आहे.

रॅपिडोच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करताना कारवाईचा सामना करण्यापेक्षा वाहनमालकांनी वेळीच सावध होऊन कायदेशीर अडचणी टाळाव्यात, हा या आवाहनामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

मंठ्यात शासकीय रेशनच्या धान्याचा काळाबाजार उघड

२,५१० किलो गहू-तांदळ्यासह बोलेरो पिकअप जप्त५ लाख ७२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत



मंठा । प्रतिनिधी

सर्वसामान्य आणि गरजू कुटुंबांसाठी शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याचा प्रकार मंठा तालुक्यात उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, जालना पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे मंठा-जिंतूर महामार्गावरील हळसवाडी परिसरात कारवाई करीत तब्बल २ हजार ५१० किलो गहू व तांदळ जप्त केला.

या कारवाईत धान्याची वाहतूक करणारी महिंद्रा बोलेरो पिकअप गाडीदेखील ताब्यात घेण्यात आली आहे.धान्याची अवैध वाहतूक; ५.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त!दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी हळसवाडी परिसरात सापळा रचून कारवाई केली. यावेळी शासकीय सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत वितरित होणारा गहू व तांदूळ अवैधरित्या साठवून काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहनातून वाहतूक केला जात असल्याचे आढळून आले.पोलिसांनी घटनास्थळावरून ४८० किलो गहू (किंमत १२ हजार रुपये), २ हजार ३० किलो तांदूळ (किंमत ६० हजार ९०० रुपये) आणि ५ लाख रुपये किमतीची महिंद्रा बोलेरो पिकअप (क्रमांक -२८ -४०२९) असा एकूण ५ लाख ७२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.तिघांविरुद्ध गुन्हा दाखलया प्रकरणी दत्तात्रय अर्जुन वाघ (वय २७, रा. हळसवाडी), नितीन भारतराव वडकुते व सचिन भारतराव वडकुते (दोघेही रा. मंठा) या तिघांविरुद्ध पोलीस ठाणे मंठा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३९/२०२६ अन्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. देशमुख करीत आहेत.रेशनचे धान्य नेमके कुठून आले आणि ते कोणाला विक्रीसाठी नेले जात होते, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा अपहार किंवा काळाबाजार होत असल्यास त्यामागील संपूर्ण साखळी उघड होणे गरजेचे आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासातून धान्याच्या स्रोतापासून ते संभाव्य खरेदीदारांपर्यंतची माहिती समोर येते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

परभणीत ६ नोव्हेंबर रोजी स्वरमय दिवाळी पहाट सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

परभणी । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणानिमित्त परभणी शहर महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिवाळी सांज आणि दिवाळी पहाट या दोन सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक कलावंतांचा दिवाळी सांज कार्यक्रम, तर शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता 'बाबुजी आणि मी' या संकल्पनेवर आधारित श्रीधर सुधीर फडके यांचा स्वरमय दिवाळी पहाट कार्यक्रम राजगोपालचारी उद्यान येथे होणार आहे.

या कार्यक्रमांना महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, उपआयुक्त प्रज्ञावंत कांबळे, तुकाराम कदम, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे आणि सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित दिवाळी सांज कार्यक्रमात परभणीतील स्थानिक कलावंत आपली कला सादर करणार आहेत. यामध्ये अमजद खान, राहुल वहिवाळ, अनिकेत सराफ, ओवी राजू काजे, मिलिंद जोशी, प्राचार्य नितीन लोहट, शुभम मस्के, धीरज पोळ, अनुष्का शहाणे, राजेश शाह, प्रा. कृष्णराज लव्हेकर, सौ. रुपाली लव्हेकर आणि योगेश पेडगावकर यांचा सहभाग राहणार आहे.

शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता 'बाबुजी आणि मी' या स्वरमय दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध गायक श्रीधर सुधीर फडके, गायिका शेफाली कुलकर्णी साकुरीकर आणि आसावरी बोधनकर यांच्यासह तबलावादक तुषार आग्रे, बासरीवादक आदित्य गोगटे, तालवाद्य कलाकार नीलेश पाठक आणि निवेदिका सुकन्या जोशी यांची उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय प्रभाग समिती सभापती रईस खान, मुसद्दीक खान, तबस्सुम वसीम शेख, समाजकल्याण समिती सभापती राजेश रणखांबे, महिला व बालकल्याण समिती सभापती अश्विनी अमोल जाधव, बांधकाम समिती सभापती सायरा बेगम अलीमोहीन, आरोग्य समिती सभापती अबोली कांबळे, विधी व अर्थ समिती सभापती रुखसाना बेगम हमीद जहागीरदार, शहर सुधार समिती सभापती शुभांगी शुभम पाष्टे आणि शिक्षण समिती सभापती शमशाद बेगम सय्यद इलाही उपस्थित राहणार आहेत.

या दोन्ही सांस्कृतिक कार्यक्रमांचा परभणीकरांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे आणि उपआयुक्त प्रज्ञावंत कांबळे व तुकाराम कदम यांनी केले आहे.

श्रीमती श्रीमती एल. एन. पांचाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय घनसावंगी, जि. जालना यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .२७८/२०२६
कुसुम वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड एस.जी.देवडे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **कुसुम भ्र. श्रीकिसन कंटुले, रा.कुं. पिंपळगाव, ता. घनसांवगी, जि. जालना.** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, कुं. पिंपळगाव** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा **मुलगा नामे विश्वजीत पि. श्रीकिसन कंटुले यांची** दि. ०६/०७/२०१५ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १०/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, घनसावंगी

श्रीमती श्रीमती एल. एन. पांचाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय घनसावंगी, जि. जालना यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .२८४/२०२६
मुकेश वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **मुकेश पि. दौलतराव तौर, रा.लिंबी ता. घनसांवगी, जि. जालना.** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय लिंबी** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा **मुलगा नामे समर्थ पि. मुकेश तौर यांची** दि. २१/०१/२०१० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, घनसावंगी

श्रीमती श्रीमती एल. एन. पांचाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय घनसावंगी, जि. जालना यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .२६९/२०२६
लक्ष्मण वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **लक्ष्मण पि. नारायण लोणके, रा.जोगलादेवी ता. घनसांवगी, जि. जालना.** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय,जोगलादेवी** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा **मुलगा नामे अभिषेक लक्ष्मण लोणके यांची** दि. ०१/१०/२०२२ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०३/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, घनसावंगी

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९२२/२०२६
भागवत वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड.व्ही.एस.शिंदे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **भागवत रामभाऊ भोसले, रा.सिरसदेवी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिरसदेवी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३ अ) प्रमाणे अर्जदार **यांचे मुले, १)गिता पि.भागवत भोसले जन्म दि.२८/०४/२००९,२) भाग्यश्री पि.भागवत भोसले जन्म दि.१८/११/२०११, ३) ऋषिकेश पि.भागवत भोसले जन्म दि.१५/०५/२०१३** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्रीमती श्रीमती एल. एन. पांचाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय घनसावंगी, जि. जालना यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .२८३/२०२६
सुनिल वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड एस.आर. तांगडे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुनिल पि.श्रीमंतराव पोकळे, रा.चित्रवडगाव, ता. घनसांवगी, जि. जालना.** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय,चित्रवडगाव** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा **मुलगी नामे सई पि. सुनिल पोकळे यांची** दि. २७/१२/२०११ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, घनसावंगी

श्रीमती श्रीमती एल. एन. पांचाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय घनसावंगी, जि. जालना यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .२८३/२०२६
सुनिल वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड एस.आर. तांगडे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुनिल पि.श्रीमंतराव पोकळे, रा.चित्रवडगाव, ता. घनसांवगी, जि. जालना.** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय,चित्रवडगाव** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा **मुलगा नामे हर्षल पि. सुनिल पोकळे यांची** दि. ०१/०६/२००४ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, घनसावंगी

श्रीमती सुचिता एच.राठी अति मुख्य न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.३, अंबड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .५९०/२०२६
कृष्णा वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड एस.ए.काळबंडे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **काका पि. शिवाजी कोकणे, रा.साडेसावंगी,** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रा.साडेसावंगी, ता.अंबड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार यांची **आई नामे सुलाबाई दगडु घाडगे** यांच्या दि. १९/०१/२०२१ रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/११/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७५२/२०२६
नंदु वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड.बी.ई.खरात)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नंदु पि. शेषेराव पटाईत, रा.सिरसदेवी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिरसदेवी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३ अ) प्रमाणे अर्जदार **यांचे मुले १) दिपक नंदु पटाईत जन्म दि.** ३१/१०/२००८ २) **रुक्मीण नंदु पटाईत जन्म दि. ०६/०१/२०११ ३) कृष्णा नंदु पटाईत जन्म दि.०५/०५/२०१३** रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०१२/२०२६
मनिषा वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **मनिषा विजयराव सरडे, रा.राक्षसभुवन, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, राक्षसभुवन, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची नामे मनिषा विजयराव सरडे यांच्या दि. १९/१०/१९८८ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २४/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७८३/२०२६
मनिषा वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **मनिषा लक्ष्मीकांत चव्हाण, रा. आडपिंपरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धुमेगांव/आडपिंपरी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांचा मुलगा नामे हार्दिक लक्ष्मीकांत चव्हाण** यांच्या दि. २५/०१/२०२४ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७८७/२०२६
सुदाम वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुदाम भुजंगराव गोरे, रा.आमला, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे श्रुति सुदाम गोरे यांच्या दि.०१/०७/२०१० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९०४/२०२६
उध्दव वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय
(मार्फत ॲड.जी.एस.डोईफोडे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **उध्दव पि. तुळशीराम साबळे, रा. खेर्डावाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डावाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची मुलगी नामे विद्या उध्दव साबळे** यांच्या दि. १३/०४/२००९ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः ३१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/- शिक्का आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
गुरुवार दि. ०५ नोव्हेंबर २०२६
Thurssday, Dt. 05 November 2026
पान -४
PAGE - 4

परळी नगर परिषदेत आधुनिक वाहनांची भर; सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट आणि बुलेट दाखल!

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत वाहनांचे लोकार्पण

परळी वैजनाथ : प्रतिनिधी....

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्याच्या दृष्टीने परळी नगर परिषदेत नवीन वाहनांची भर पडली आहे. नगर परिषदेकडे सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट तसेच बुलेट उपलब्ध झाली असून, या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि सर्व नगर-सेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले.



शहरातील स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन तसेच विविध नागरी सुविधांच्या कामांना गती देण्यासाठी सक्शन मशीन उपयुक्त ठरणार आहे. तर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थिती अथवा जलमय भागातील आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापनाची बोट महत्त्वाची भूमिका बजावू शकते. याशिवाय बुलेटमुळे आपत्कालीन कामकाज आणि क्षेत्रीय पातळीवरील हालचालींना मदत होणार आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता नगर परिषदेकडे आवश्यक यंत्रसामग्री आणि साधनसामग्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. नव्याने दाखल झालेल्या या वाहनांमुळे स्वच्छता व आ-पत्ती व्यवस्थापनाच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, यांच्यासह सर्व सभापती, गटनेते, नगरसेवक आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाणीचोरी रोखण्यासाठी वीज तोडण्याचे जलसिंचन विभागाचे आदेश

परळी / प्रतिनिधी

वाण धरणातील पाणीसाठा तळाला गेला असताना आणि परळीकरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी तो राखीव ठेवण्यात आला असताना, 'ओंकार साखर कारखाना प्रा. लि. (युनिट नं. ८)' बेकायदेशीरपणे पाण्याचा उपसा करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या मुजोर कारखान्याला चपराक लावण्यासाठी वाण धरण जलसिंचन विभागाने थेट महावितरणला पत्र लिहून कारखान्याच्या पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्याची धडक मागणी केली आहे.

वाण धरणातील अत्यल्प पाणीसाठा लक्षात घेता, जिल्हाधिकाऱ्यांनी हे पाणी परळी शहरासाठी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवले आहे. असे असून देखील दुष्काळजन्य परिस्थिती मध्ये ओंकार साखर कारखाना कोणत्याही परवानगीशिवाय अनधिकृतपणे पाणी उपसत आहे. यापूर्वी अधिकृतरीत्या कळवूनही कारखान्याने पाणी उपसा थांबवला नाही. कारखान्याची ही अरेरावी पाहता, वाण सिंचन शाखेच्या अधिकाऱ्यांनी महावितरणच्या उपविभागीय अभियंत्यांना अधिकृत पत्र पाठवून ओंकार साखर कारखान्याच्या पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा त्वरित खंडित करण्याची ठोस कारवाई प्रस्तावित केली आहे.

एकीकडे जनता पाण्यासाठी वणवण भटकण्याची शक्यता असताना, कारखान्याकडून होणारी ही बेसुमार पाणीचोरी संतापजनक आहे. जलसिंचन विभागाने उचललेल्या या कठोर पावलामुळे बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. आता महावितरण यावर किती वेगाने कारवाई करते, याकडे लक्ष लागून आहे.

बारदाना कटिंगच्या नावाखाली लूट सोयाबीन खरेदीत क्विंटलमागे तीन ते पाच किलोची कपात

धर्माबाद / अशोक पडोळे

शेतात घाम गाळून पिकविलेल्या सोयाबीनच्या विक्रीतही शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सोयाबीन सॉल्व्हेंट प्लांटमध्ये खरेदी करताना बारदाना कटिंग आणि बटावच्या नावाखाली क्विंटलमागे तीन ते पाच किलोपर्यंत वजनाची कपात केली जात असल्याचा आरोप करत नांदेड जिल्हा आडत व्यापारी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष सुबोध काकाणी, सचिव नागनाथ अंतनवाड यांनी केला आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. बारदाना कटिंग आणि बटावच्या नावाखाली होणाऱ्या या कपातीमुळे शेतकऱ्यांना क्विंटलमागे ४०० ते ५०० रुपयांपर्यंत आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. ही कपात पद्धत तातडीने बंद करून सोयाबीनची खरेदी निव्वळ वजनावर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

सोयाबीन विक्रीसाठी बाजारात आणल्यानंतर प्रत्यक्ष वजनापेक्षा कमी वजनाची नोंद केली जात असल्याचे असोसिएशनने निदर्शनास आणून दिले आहे. प्रति क्विंटल एक ते १.२०० किलो बारदाना कटिंग, तर दोन ते चार किलो बटाव अथवा ओलाव्याच्या नावाखाली वजनात कपात केली जाते. परिणामी, योग्य मोबदला मिळत नाही.

व्यापाऱ्यांनाही आर्थिक झळ..

या कपात पद्धतीचा फटका आडत व्यापाऱ्यांनाही बसत आहे. सॉल्व्हेंट प्लांटचे खरेदी दर आणि व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांना दिले जाणारे दर यामध्ये तफावत निर्माण होते. त्यातच हमाली, मार्केट फी आणि वाहतूक खर्चाचा अतिरिक्त भार व्यापाऱ्यांवर पडत आहे. त्यामुळे शेतकरी आणि व्यापारी या दोघांचेही आर्थिक गणित विस्कळीत होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

निव्वळ वजनावर खरेदीचे आदेश द्या..

बारदाना कटिंग आणि बटावच्या नावाखाली केली जाणारी वजनातील कपात तातडीने बंद करावी. सोयाबीनची खरेदी निव्वळ वजनावर करून प्रत्यक्ष वजनानुसार आणि ठरलेल्या दराने शेतकऱ्यांना मोबदला मिळावा, यासाठी जिल्ह्यातील सर्व सॉल्व्हेंट प्लांटला स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी असोसिएशनने केली. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळण्यासोबतच बाज-ारातील व्यवहार अधिक पारदर्शक होतील, असा विश्वासही असोसिएशनने व्यक्त केला.

पालकमंत्री पंकजा मुंडे यांची भाजप युवा कार्यकर्ते प्रकाश जायभाये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

घुंगर्डे हादगाव / बंडू शिंगटे



राज्याच्या पालकमंत्री तथा भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांनी जालना येथील भाजपचे युवा कार्यकर्ते प्रकाश अण्णासाहेब जायभाये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.या भेटीमुळे जायभाये कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी जायभाये कुटुंबीयांच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे उत्साहात स्वागत करून त्यांचा सत्कार करण्यात आला.मुंडे यांनी कुटुंबीयांशी आस्थेने संवाद साधत त्यांच्या विचारपुशी केली.याप्रसंगी विविध सामाजिक,राजकीय आणि स्थानिक विषयांवर अनौपचारिक चर्चा झाली.पालकमंत्र्यांच्या या सदिच्छा भेटीमुळे स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विशेष म्हणजे व्यस्त दौऱ्यातून वेळ काढून त्यांनी निवासस्थानी भेट दिल्याने प्रकाश जायभाये व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. यावेळी जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महापालिका आयुक्त अंजली शर्मा, पाणीपुरवठा सभापती पूनम स्वामी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या भेटीच्या निमित्ताने उपस्थितांमध्ये स्नेहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

आ.हिकमत उढाण यांच्या पुढाकारातून पाणीपुरवठा सुरू प्रशासनाकडून प्रस्तावांना मंजुरी

घनसावंगी / मारोती सावंत

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार हिकमत दादा उढाण यांच्या पुढाकारातून आणि प्रशासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मतदारसंघातील २१ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

दुष्काळामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. महिलांसह ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार हिकमत उढाण यांनी पाणीटंचाईचा प्रश्न प्राधान्याने हाती घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला.त्यानंतर विविध गावांचे टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

यामध्ये जालना ग्रामीणमधील चितळी पुतळी, विरेगाव आणि शिंगाडे पोखरी या गावांचा समावेश आहे. घनसावंगी तालुक्यातील दहेगव्हाण, यावलपिंप्री तांडा, हातडी, बेलवाडी, शिंदखेड अंतर्गत शिंदखेड तांडा,बोरगाव खुर्द व भीमनगर,मासेगाव व माऊलीनगर,भेंडाळा अंतर्गत भेंडाळा तांडा व बंगलेवाडी, ढाकेफळ अंतर्गत ढाकेफळ तांडा क्रमांक १ व २, रामगव्हाण, भद्रेगाव तसेच राहेरा अंतर्गत तनवाडी व राहेरा तांडा या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. तर अंबड ग्रामीणमधील बेलगाव, सुखापुरी आणि शहापूर या गावांचाही टँकर मंजूर गावांमध्ये समावेश आहे. दुष्काळाच्या कठीण परिस्थितीत नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये यासाठी आमदार हिकमत दादा उढाण यांनी प्रशासनाशी समन्वय साधत तातडीने उपाययोजना करण्यावर भर दिला आहे.गावोगावी पाणीटंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात येत आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी टँकरद्वारे सुरू झालेला पाणीपुरवठा दिलासादायक ठरत असून पाणीटंचाईच्या काळात नागरिकांच्या मूलभूत गरजेला प्राधान्य देण्याच्या या निर्णयाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे.

वडवणी तालुक्यातील सिंचन प्रश्न सोडविण्यासाठी अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा - मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांची सिंचनाची मागणी लक्षात घेता, अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी सध्या अस्तित्वात असलेल्या तलावांमध्ये साठवून त्याद्वारे सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देता येईल का, याची व्यवहार्यता तपासावी, तसेच उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

वडवणी तालुक्यातील अप्पर (ऊर्ध्व) कुंडलिका प्रकल्प, सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम तसेच परिसरातील तांड्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर मंत्रालयात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत बिचकुलदरा तांडा, सरकारखोरी तांडा आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या परिसरातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अप्पर कुंडलिका प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला. तसेच सोन्नाखोटा डावा कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे आणि संबंधित तांड्यांच्या परिसरातील लाभक्षेत्र वाढविण्याबाबत चर्चा झाली.मृद व जलसंधारण विभागांतर्गत असलेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही मंत्री राठोड यांनी दिल्या. याशिवाय परिसरात नवीन जलसंधारण तलाव मंजूर करण्याच्या प्रस्तावावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. उपलब्ध जलस्रोत, सिंचनाची गरज आणि संभाव्य लाभक्षेत्र यांचा विचार करून सर्वंकष व अभ्यासपूर्ण आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यामुळे उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करून परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करता येणार आहेत.या उपाययोजनांमुळे बिचकुलदरा, सरकारख-ोरी आणि चौफाळदरा तांडा परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यास मदत होणार आहे. बैठकीस विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह जलसंपदा व मृद व जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत ५७,८७३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ५८९.९३ कोटी रुपये जमा

बीड (जिमाका)

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत बीड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. शासनाने जाहीर केलेल्या चौथ्या यादीनुसार जिल्ह्यातील ५७,८७३ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर तब्बल ५८९ कोटी ९३ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. चौथ्या यादीतील लाभ दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या चौथ्या यादीत बीड जिल्ह्यातील ५७,८७३ शेतकऱ्यांना ५८९.९३ कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे. यामध्ये बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पीक कर्ज घेतलेल्या १,४८७ शेतकऱ्यांचे ६.९५ कोटी रुपये, तर उर्वरित रक्कम राष्ट्रीयकृत बँका व महार-ाष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे.



यापूर्वी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या यादीमधील राष्ट्रीयकृत बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १,१०,८७८ शेतकऱ्यांच्या एकूण ९१८.५६ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीला मंजुरी मिळाली होती. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील एकूण १,६८,७५१ शेतकऱ्यांना १५०८.४९ कोटी रुपये इतक्या विक्रमी रकमेची कर्जमुक्ती या योजनेमुळे मिळाली आहे.

शासनाच्या या योजनेचा लाभ मिळावा यासाठी यापूर्वी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या यादीतील एकूण २०४,३६६ थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची नावे जाहीर झाली होती, त्यापैकी आतापर्यंत १७५,४२९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे.

अद्यापही जिल्ह्यातील २८,९३७ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. यापैकी तब्बल ११,०८० शेतकऱ्यांकडे 'फार्मर आयडी' उपलब्ध नाही. ज्या शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी तात्काळ आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून प्रश्न सोडविण्यावर भर फेडरेशनचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्जवसुलीच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी तसेच पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने बीड तालुका पतसंस्था फेडरेशनच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक, बीड यांना निवेदन देण्यात आले.

फेडरेशनचे अध्यक्ष कल्याण आखाडे व उपाध्यक्ष ॲड प्रकाश कवठेकर, शिवाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. पतसंस्था क्षेत्रातील विविध प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल फेडरेशनच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. पोलीस प्रशासन नेहमीच कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सर्वसामान्य नागरिक आणि सहकार क्षेत्राच्या अडचणी समजून घेऊन सकारात्मक भूमिका घेत आहे. याच सहकार्याच्या भावनेतून पतसंस्था क्षेत्रातील काही प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून समन्वयाने मार्ग काढण्याची भूमिका फेडरेशनने मांडली.



पतसंस्था या सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक आणि ठेवीदारांसाठी आर्थिक आधाराचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत. ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करणे आणि थकीत कर्जाची वसुली करणे ही संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर मार्गाने राबविताना पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना काही अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी पोलीस प्रशासनाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्यास हे प्रश्न अधिक सुलभतेने सोडविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कर्जवसुलीच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या तक्रारी व वादांमध्ये दोन्ही बाजूंची वस्तुस्थिती समजून घेऊन कायद्याच्या चौकटीत निष्पक्ष कार्यवाही व्हावी. पतसंस्थांचे कामकाज सुरळीत चालावे, कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करता यावे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण व्हावे, यासाठी पोलीस प्रशासन व पतसंस्था फेडरेशन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद आणि समन्वय राहावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली.

पोलीस प्रशासन आणि सहकार क्षेत्र यांच्यातील परस्पर सहकार्यामुळे जिल्ह्यातील पतसंस्था क्षेत्रातील प्रश्न सकारात्मक पद्धतीने मार्गी लागतील, असा विश्वास फेडरेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.यावेळी फेडरेशनचे उपाध्यक्ष ॲड प्रकाश कवठेकर, संचालक शिवाजी देसाई, अर्जुन राऊत, संतोष सपकाळ, राहुल शिंदे, अशोक राऊत, सखाराम राऊत, चक्रधर कदम, नवनाथ खरसाडे, अंतराम गात, सखाराम शिंदे, रमेश मदने, संजय घरत, अशोक उगले, राजेंद्र ढोले, अजय धांडे, गौरीशंकर धर्माधिकारी, मुकुंद रनखांबे, सुनिल चव्हाण, मुकेश भांडवलकर, पांडुरंग घोडके, लक्षदीप पतसंस्था आदी पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.विश्वांभर देशमाने यांचे कर्तव्यनिष्ठ कार्य संस्थेसाठी आदर्शवत - डॉ.योगेश क्षीरसागर

बीड प्रतिनिधी

कामातील कमालीची तत्परता, निर्व्यसनी जीवनशैली आणि सत्यनिष्ठेच्या बळावर सेवेत जपलेला प्रामाणिकपणा हे डॉ.विश्वांभर देशमाने यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे वैशिष्ट्य आहे. माणसे जोडण्याची आणि ती सातत्याने जपण्याची त्यांची वृत्ती नवगण शिक्षण संस्थेच्या वाटचालीत नेहमीच प्रेरणादायी ठरली आहे, असे गौरवोद्गार नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी काढले.

बीड येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक डॉ.विश्वांभर त्रिंबक देशमाने हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्त महाविद्यालयात बुधवारी (दि.४) सेवागौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर होत्या. व्यासपीठावर संचालक आमेर सिद्दीकी, नगरसेवक नागेश तांबारे, मुन्ना गायकवाड, सुभाष क्षीरसागर, सत्कारमूर्तींचे वडील



त्रिंबकराव देशमाने, प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, प्रा.नामदेव चांगण, प्रा.आसाराम खुटाळे, प्राचार्य डॉ.आबासाहेब हांगे, प्राचार्य डॉ. खाकरे आणि सत्कारमूर्तींचे बंधू अरुण देशमाने उपस्थित होते.डॉ.योगेश क्षीरसागर पुढे म्हणाले की, डॉ.विश्वांभर देशमाने यांना वारकरी संप्रदाय आणि अध्यात्माची मनापासून आवड आहे. कुटुंबातील उच्च संस्कारांमुळे त्यांनी संपूर्ण सेवाकाळात कोणतीही तडजोड न करता पारदर्शकपणे काम केले. नियत वयोमानानुसार ते सेवानिवृत्त होत असले, तरी नवगण शिक्षण संस्थेच्या आगामी विस्तारासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांचे अनुभवसंपन्न सहकार्य व मार्गदर्शन यापुढेही लाभत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्व.केशरकाकू आणि नाना यांच्या प्रतिमांचे पूजन करून तसेच संगीत विभागातील डॉ.प्रियंका देशमाने यांच्या सरस्वती स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी केले, तर आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी मान्यवरांसह संस्थेच्या विविध शाखांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ.विश्वांभर देशमाने यांचा सपत्नीक सत्कार करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास नवगण शिक्षण संस्था आणि विनायक शिक्षण मंडळातील पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

देशमानेंसारखे समाजशील व्यक्ती आजच्या काळात दुर्मिळ – डॉ.दीपाताई क्षीरसागर

अध्यक्षीय भाषणात डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी डॉ.विश्वांभर देशमाने यांच्या तीन पिढ्यांशी जोडलेल्या ३३ वर्षे आणि ३ महिन्यांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरव केला. कोणत्याही आमिषाला बळी न पडता संस्थेशी एकनिष्ठ राहून कार्य करणारे समाजशील व्यक्ती आजच्या काळात दुर्मिळ असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच देशमाने यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना डॉ.विश्वांभर देशमाने यांनी संस्थेच्या संस्थापिका तथा माजी खासदार स्व.केशरकाकू यांच्या प्रेरणेमुळेच आस्थेवाईकपणे आणि प्रामाणिकपणे काम करण्याची ऊर्जा मिळाल्याची कृतज्ञ भावना व्यक्त केली.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत आरटीओची धडक तपासणी मोहीम!

अंबाजोगाई प्रतिनिधी

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतुकीतील नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांच्या वतीने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत प्रवाशांकडून जादा भाडे आकारणी, परराज्यात नोंदणी असलेली प्रवासी वाहने, बसमधून होणारी अवैध मालवाहतूक तसेच रस्ता सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.



या विशेष मोहिमे दरम्यान काल एकूण २१ वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून तब्बल ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

दिवाळीच्या काळात प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने काही खासगी प्रवासी वाहतूकदारांकडून जादा भाडे आकारण्याची शक्यता असते. तसेच प्रवासी बसमधून नियमबाह्य मालवाहतूक केल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने ही मोहीम अधिक प्रभावीपणे हाती घेतली आहे.

या तपासणी मोहिमेत परिवहन अधिकारी विजयसिंह भोसले, निलेश पाटील, शुभम लवळे आदी परिवहन अधिकारी तसेच महादेव फड व मुश्ताक मोमीन हे चालक सक्रियपणे कार्यरत आहेत.

प्रवाशांची सुरक्षितता, नियमबद्ध वाहतूक आणि जादा भाडे आकारणीला आळा घालणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असून, सणासुदीच्या काळातही वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाच्या या मोहिमेतून स्पष्ट होत आहे.

परळीच्या जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडेंना चिमुकल्याचा निरागस नमस्कार, पंकजाताईंनी काम थांबवून साधला संवाद

परळी वैजनाथ प्रतिनिधी

जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी परळीत आयोजित केलेल्या जनता दरबारात एका चिमुकल्याच्या निरागस कृतीने काही क्षणांसाठी वातावरण हलकेफुलके झाले. सुरुवातीला सभागृहात रडत असलेला हा चिमुकला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासमोर येताच हसू लागला. एवढेच नव्हे, तर त्याने हात जोडून त्यांना नमस्कारही केला. या अनपेक्षित कृतीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पंकजाताई मुंडे याही या निरागस क्षणांमध्ये काही काळ बालविश्वात रममान झाल्याचे बघायला मिळाले.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा आज परळी येथे जनता दरबार होता.या जनता दरबारात जनतेची गाऱ्हाणी व तक्रारींचा निपटारा करत



असताना सभागृहात उपस्थित अभ्यागता मध्येलहान मूल रडण्याचा आवाज घुमला. हा रडण्याचा आवाज ऐकताच 'अरे कोणाशी बाळ रडत आहे त्यांना अगोदर पाठवा' अशी सूचना पंकजाताईंनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिली. जेव्हा आपल्या आई समवेत हे बाळ पंकजाताई समोर आले त्यावेळी अगोदर रडणारा हा चिमुकला ताईसमोर येतात मात्र हसत नमस्कार घालू लागला. या चिमुकल्याचा नमस्कारपाहून पंकजाताई मुंडे यांनीही जनता दरबारातील आपले कामकाज काही काळ थांबवले. त्याच्याशी हसत-खेळत संवाद साधत त्या त्याच्या निरागस बालविश्वात रमल्या. त्याचे कौतुक करत त्यांनी त्याला चॉकलेटही दिले. ताईंच्या या सहज आणि आपुलकीच्या प्रतिसादामुळे चिमुकल्याच्या चेहऱ्यावर आनंद खुलला.

जीवनातील व्यस्त कामकाज आणि नागरिकांच्या प्रश्नांची गर्दी असतानाही एका लहान मुलाशी संवाद साधण्यासाठी वेळ देण्याच्या या कृतीतून पंकजाताईंची संवेदनशील बाजू दिसून आली. जनतेच्या तक्रारी आणि मागण्यांच्या चर्चेत या छोट्याशा प्रसंगाने वेगळेच भावनिक चित्र निर्माण केले. आधी रडणारा चिमुकला, ताईंसमोर येताच त्याने केलेला नमस्कार आणि त्यानंतर झालेला संवाद, चॉकलेटची छोटीशी भेट... या प्रसंगाने उपस्थितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. मोठ्या राजकीय घडामोडींपेक्षा कधी कधी अशा साध्या मानवी क्षणांतूनही सार्वजनिक जीवनातील संवेदनशीलतेचे दर्शन घडते, याची प्रचिती या प्रसंगातून आली.

ना. पंकजाताई मुंडेंमुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ, कॅबिनेट बैठकीत झाला निर्णय

मुंबई प्रतिनिधी :

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि ग्रामीण पशुवैद्यकीय आरोग्यसेवेला बळकटी देणारा आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार असून, ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये सेवा देण्यासाठी त्यांना अधिक प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. भारतीय पशुचिकित्सा परिषदेच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या पशुचिकित्सालयात एक वर्षासाठी आंतर्वासिता पशुवैद्यक म्हणून काम करणे अनिवार्य असते. या कालावधीत त्यांच्या निवास, भोजन आणि प्रवासासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चापोटी अकरा हजार रुपये दिले जात असत. पण आता त्यांना दरमहा अठरा हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापैकी पंधरा हजार रुपये राज्य शासन देणार आहे. उर्वरित तीन हजार रुपये भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या निधीमधून देण्यात येणार आहे. अनुसंधान परिषद केवळ सहा महिन्यासाठी निधी देते. त्यापुढील सहा महिन्याचा निधी देण्यासाठी विद्यापीठाच्या स्वनिधीमधून खर्च करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला.

पशुपालकांना दर्जेदार सेवा मिळेल...

या निर्णयावर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, राज्यातील पशुधनाचे आरोग्य जपणे, पशुपालकांना दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील पशुचिकित्सा यंत्रणा अधिक सक्षम करणे, हे शासनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्देशाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पशुवैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अंतिम टप्प्यात प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. या कालावधीत विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये काम करण्याची, पशुधनाच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेण्याची तसेच प्रत्यक्ष पशुचिकित्सा सेवेत सहभागी होण्याची संधी मिळते. या विद्यार्थ्यांच्या कामाचे महत्त्व आणि त्यांच्यावर असलेली जबाबदारी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन..

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, या निर्णयामुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळण्याबरोबरच ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील पशुचिकित्सालयांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता वाढविण्यास या निर्णयाचा हातभार लागेल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल, त्यांच्या कौशल्यात वाढ होईल आणि भविष्यात सक्षम पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा देण्यासाठी त्यांची तयारी अधिक चांगल्या प्रकारे होईल.

राज्य शासनाचा हा निर्णय केवळ विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्यापुरता मर्यादित नसून, राज्यातील पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, ग्रामीण भागाला सक्षम पशुवैद्यकीय मनुष्यबळ आणि शेतकरी-पशुपालकांना अधिक चांगल्या सेवा, असा या निर्णयाचा व्यापक उद्देश आहे. राज्यातील पशुधनाचे संवर्धन आणि पशुपालकांचे आर्थिक हित जपण्यासाठी शासन यापुढेही आवश्यक त्या उपाययोजना करण्यास कटिबद्ध आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जरेवाडीच्या तीन विद्यार्थ्यांची थेट 'इस्रो-नासा' शैक्षणिक सहलीसाठी निवड, ग्रामीण गुणवत्तेचा पुन्हा एकदा डंका.!

पाटोदा प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि जिद्दीच्या जोरावर यशाचे नवे शिखर गाठले आहे. पाटोदा तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जरेवाडी येथील तब्बल तीन विद्यार्थ्यांची प्रतिष्ठेच्या 'इस्रो-नासा' (-) शैक्षणिक सहलीसाठी जिल्हास्तरावरून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, या निवड चाचणीत जरेवाडीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे तिन्ही क्रमांक पटकावत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा संपूर्ण जिल्ह्यात उमटवला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणीत जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत जरेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण तयारीच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी केली.

कु. श्रेया विठ्ठल शेळके: ५८ गुण मिळवून प्रथम क्रमांक, चि. विकास जालिंदर सानप: ५७ गुण मिळवून द्वितीय क्रमांक, कु. अवनी युवराज पवार: ५६ गुण मिळवून तृतीय क्रमांक.

एकाच शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर पहिले तीन क्रमांक मिळवून थेट इस्रो-नासा शैक्षणिक सहलीसाठी पात्रता मिळवली आहे. जरेवाडी शाळेच्या शैक्षणिक इतिहासातील ही निश्चितच एक गौरवास्पद आणि अविस्मरणीय कामगिरी ठरली आहे.

मार्गदर्शन आणि सहकार्य..

या यशामागे विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. या यशाबद्दल प्रशासकीय व ग्रामपातळीवरील मान्यवरांनी कौतुक केले आहे: श्रीमान संतोषजी माने साहेब (गट विकास अधिकारी, पाटोदा), श्रीमान सिद्धांत कांबळे साहेब (गटशिक्षणाधिकारी), श्री निलेश जी मोरे (सरपंच, जरेवाडी), श्री. श्रीनिवास कोकणे सर (मुख्याध्यापक), श्री. संदीप पवार सर (ज्येष्ठ शिक्षक तथा राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त)



श्री अंगदजी जरे (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती), तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा दिली. शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांनी तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

ग्रामीण भागातून विज्ञानाची मोठी झेप आज ग्रामीण भागातील विद्यार्थीही अवकाश संशोधन, विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहू शकतात आणि ती प्रत्यक्षात उतरवण्याची क्षमता त्यांच्यात आहे, हे जरेवाडीच्या या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. 'इस्रो-नासा'सारख्या जागतिक स्तरावरील वैज्ञानिक संस्थांची माहिती प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी या विद्यार्थ्यांना मिळणार असून, हा अनुभव त्यांच्या ज्ञानविश्वाला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची, शिक्षकांच्या समर्पित कार्याची आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीची ही यशोगाथा परिसरातील इतर शाळांसाठीही मोठी प्रेरणादायी ठरणार आहे.

''यशासाठी मोठ्या शहराची नव्हे, तर मोठ्या स्वप्नांची, कठोर परिश्रमांची आणि योग्य मार्गदर्शनाची गरज असते,'' हे जरेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
गुरुवार दि. ०५ नोव्हेंबर २०२६
Thurssday, Dt. 05 November 2026
पान - ६
PAGE - 6

नीती आयोगाच्या 'आकांक्षित जिल्हा व तालुका' कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये 'आकांक्षा हाट'चे उद्घाटन - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते शुभारंभ

'वोकल फॉर लोकल'चा नारा- महिला स्वयंसहाय्यता गट व शेतकऱ्यांच्या उत्पादनांना मिळणार बाजारपेठ

बीड दि.०४(जिमाका): नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमांतर्गत बीड जिल्हा परिषद आवारात 'आकांक्षा हाट' (वोलक फॉर लोकल) या दोन दिवसीय विक्री प्रदर्शनाचे आणि महोत्सवाचे दिमाखात उद्घाटन झाले. बीडचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन () यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटन समयी आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी, जिल्ह्यातील शेतकरी आणि महिला स्वयंसहाय्यता गटांनी शासकीय योजनांचा लाभ घेत विविध उद्योगांच्या माध्यमातून आपले आर्थिक जीवनमान उंचावण्याचे आवाहन केले. ''दुष्काळ असो वा कोणतेही मोठे संकट, जेव्हा नारीशक्ती एकत्रित उभी राहते, तेव्हा विजय निश्चित असतो,'' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी यावेळी दिला.

या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक विलास जाधव, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, गटविकास अधिकारी अशोक बाराखोते वडवणी, जिल्हा व्यवस्थापक आशा पवार, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी राजेश्वर कदम, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती शीला मिसाळ, कृषी विकास अधिकारी साहिल सय्यद यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, शेतकरी, ग्रामसखी, महिला स्वयंसहाय्यता गटातील सदस्य, आशा व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जितन रहमान यांनी कार्यक्रमात बोलताना महिला गटांच्या उत्पादनांचे भरभरून कौतुक केले. 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोमी अभियान) अंतर्गत स्थापित तसेच विविध विभागांतील गरजू महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या दिवाळी फराळाची व विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आवाहन त्यांनी बीडकरांना केले. तसेच उत्पादनांचा दर्जा वाढवून ती राष्ट्रीय स्तरापर्यंत कशी पोहोचवावी, याबाबत मार्गदर्शन केले.

या दोन दिवसीय (४ व ५ नोव्हेंबर २०२६) प्रदर्शनात ग्रामीण भागातील विविध विभागांचे तब्बल ३० स्टॉल उभारण्यात आले आहेत. यामध्ये शासकीय माहिती, प्रात्यक्षिके आणि दिवाळी फराळ/साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

याशिवाय, दुष्काळ परिस्थितीमध्ये फळबागांची काळजी कशी घ्यावी आणि पाण्याचे नियोजन कसे करावे, याविषयी मार्फत शेतकऱ्यांना मोफत २५०० पुस्तकांचे वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला व शेतकऱ्यांच्या उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

सर्व विभागप्रमुखांच्या विशेष सहकार्यामुळे हा कार्यक्रम ग्रामीण महिलांना रोजगार व उद्योग निर्मितीसाठी मोठी मदत ठरणार आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा दिलासा शिव गोरक्ष आश्रम ट्रस्टकडून प्रत्येकी २५ हजारांचे वाटप; वारसांना स्वयंरोजगारासाठीही प्रशासनाचे पाठबळ

बीड, दि.०४ (जिमाका): जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नापिकीमुळे हतबल होऊन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. यात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुरावा आणि प्रयत्नांना यश आले असून, पुणे येथील श्री शिव गोरक्ष आश्रम ट्रस्ट (आंबेगाव बु.) यांच्या वतीने जिल्ह्यातील २५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील वारसांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत या धनादेशांचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर मंडलिक, राजेंद्र अडगळे आणि राजेंद्र दीक्षित यांच्या सौजन्याने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मदतीसाठी केज, माजलगाव, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, बीड, शिरूर कासार आणि वडवणी या तालुक्यातील २५ कुटुंबांची प्रशासनाकडून निवड करण्यात आली होती.

वारसांच्या पुनर्वसनासाठी सविस्तर नियोजन आणि मदतीचे स्वरूप:

या कार्यक्रमात प्रशासनाने केवळ धनादेशांचे वाटप करून औपचारिकता पूर्ण केली नाही, तर उपस्थित प्रत्येक महिला व वारसांशी अत्यंत संवेदनशीलपणे थेट संवाद साधला. या कुटुंबांना केवळ तात्पुरती आर्थिक मदत न देता, त्यांना कायमस्वरूपी स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सविस्तर चाचपणी केली.



* स्वयंरोजगारासाठी मदत: कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अधिकाऱ्यांनी महिलांना त्यांच्या कौशल्यांबद्दल विचारणा केली. ज्या महिलांना शिवणकाम येते, त्यांना शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच, शेळीपालनाची इच्छा असणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देऊन शासनामार्फत शेळ्या उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

* शिक्षण व वैद्यकीय सहाय्य: कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी मुलांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळवून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. एका कुटुंबातील आजारी व अंथरुणाला खिळलेल्या वृद्ध सदस्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

* शासकीय योजनांची खात्री: या सर्व महिलांना संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना आणि रेशनचे धान्य नियमित मिळत आहे की नाही, याची अधिकाऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर खात्री करून घेतली व त्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले.

कर्जबाजारीपणा टाळण्यासाठी सामूहिक विवाहाचे आवाहन:

सध्या जिल्ह्यात दुष्काळाचे मोठे सावट असल्याने, या परिस्थितीत लग्नसमारंभांवर अवाढव्य खर्च करून कुटुंबांनी पुन्हा कर्जबाजारी होऊ नये, असा मोलाचा सल्ला प्रशासनाने दिला. ज्या कुटुंबांमध्ये उपवर मुले-मुली आहेत, त्यांनी शासनाच्या सामूहिक विवाह योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेत सहभागी झाल्यास शासनाकडून २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, ज्यामुळे लग्नाचा संपूर्ण खर्च वाचतो. येत्या २४-२५ तारखेला आणि त्यानंतर डिसेंबर महिन्यातही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळे आयोजित केले जाणार असून, कुटुंबांनी पैशांची बचत करून समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नवीन जालन्यात भव्य उद्यान नाट्यगृह व क्रीडांगण उभारण्याची मागणी ५० कोटींच्या विशेष निधीसाठी नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांचा पाठपुरावा

पालकमंत्री पंकजाताई मुंडे व आ. अर्जुनराव खोतकर यांना निवेदन

जालना / शेख फारुक

जालना शहरातील नवीन जालना परिसरातील नागरिकांसाठी एसअरपीएफच्या आरक्षित जागेवर भव्य उद्यान, अत्याधुनिक क्रीडांगण, जलतरण तलाव आणि १२०० आसन क्षमतेचे नाट्यगृह उभारण्यात यावे अशी महत्त्वपूर्ण मागणी नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी पालकमंत्री ना. पंकजाताई मुंढे व आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे केली आहे.या विकासकामांसाठी महानगरपालिकेला ५० कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे जालना दौऱ्यावर आल्या असता नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पालकमंत्री व आमदारांना निवेदन सादर करून नवीन जालना परिसरातील नागरिकांच्या मूलभूत मनोरंजन, क्रीडा व सांस्कृतिक सुविधांकडे लक्ष वेधण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की जालना शहराची लोकसंख्या पाच लाखांहून अधिक झाली असून नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतरही शहरात उद्यान व क्रीडा सुविधांची मोठी कमतरता आहे. भौगोलिकदृष्ट्या जुना जालना आणि नवीन जालना अशा दोन भागांत विभागलेल्या शहरातील नवीन जालना परिसरात अडीच लाखांहून अधिक नागरिक वास्तव्यास आहेत.मात्र एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या तुलनेत या भागात नागरिकांसाठी मोठे उद्यान किंवा खेळाचे मैदान उपलब्ध नाही. त्यामुळे लहान मुले, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना विविध सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

महानगरपालिकेच्या विकास आरखड्यात नवीन जालन्यातील एसअरपीएफच्या दीडशे एकरांहून अधिक





जागेपैकी २० एकर जागेवर उद्यान व क्रीडांगण प्रस्तावित करण्यात आले आहे.मंठा चौफुली परिसरातील या आरक्षित जागेचा नियोजनबद्ध विकास केल्यास जालना शहराच्या वैभवात मोठी भर पडू शकते. या ठिकाणी भव्य उद्यान, जलतरण तलाव १२०० आसन क्षमतेचे नाट्यगृह व सभागृह तसेच मोठे क्रीडांगण उभारण्यात यावे अशी मागणी अंबेकर यांनी केली आहे.

विशेष म्हणजे महानगरपालिकेच्या माध्यमातून या सुविधा विकसित केल्यानंतर त्यांची देखभाल व दुरुस्ती एसआरपीएफकडे हस्तांतरित करून सदर परिसर नागरिकांसाठी खुला ठेवण्याची संकल्पनाही त्यांनी मांडली आहे. नाममात्र प्रवेश शुल्क आकारून या सुविधांचा वापर नागरिकांना करता येईल आणि देखभालीसाठी नियमित उत्पन्नाचाही स्रोत निर्माण होईल असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी ५० कोटी रुपयांचा विशेष निधी महानगरपालिकेला उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी करण्यात आली. यापूर्वीही अश्विन अंबेकर यांनी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय उपस्थित केला असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आमदार व संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. विशेष म्हणजे, उद्यान, क्रीडांगण व अन्य विकासकामांचा सविस्तर आराखडा त्यांनी स्वखर्चाने पुणे येथून तयार करून घेतला आहे.

नगरसेवक अंबेकर यांनी सादर केलेला आराखडा पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांनी पाहिला असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात मंत्रालय स्तरावर नगरविकास व गृह विभागाची बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे नवीन जालन्यातील नागरिकांच्या अनेक वर्षांपासूनच्या उद्यान व क्रीडा सुविधांच्या अपेक्षांना आता चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, युवा नेते अभिमन्यू खोतकर, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले आदी उपस्थित होते.